## दिनांक २१.०१.२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचा कार्यवृत्तांत

अमरावती महानगरपालिकेची वृक्ष प्राधिकरण समितीची सभा मा. अतिरिक्त आयुक्त यांचे कक्षा लगतच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये दिनांक २१.०१.२०२५ रोजी स.११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती सभेस खालील सन्मा. तांत्रिक सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा.आयुक्त, महानगरपालिका, अमरावती
मा.अतिरिक्त आयुक्त(१), महानगरपालिका, अमरावती
मा.अतिरिक्त आयुक्त(२), महानगरपालिका, अमरावती
मा.उपायुक्त (प्रशा), महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी,झोन क्र.१, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी,झोन क्र.२, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी,झोन क्र.३, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी,झोन क्र.४, महानगरपालिका, अमरावती
सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी,झोन क्र.५, महानगरपालिका, अमरावती
श्री.अनिल घोम, वृक्ष तज्ञ, अमरावती
मा.सिस्टीम मॅनेजर, महानगरपालिका, अमरावती
उद्यान अधिक्षक, महानगरपालिका, अमरावती

### दि.२१/०१/२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समितीचा कार्यवृतांत

### झोन क्र.१

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | वृक्षांचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | **डॉ. प्रभाकर बाजीराव जामनेकर रा.ख्रिस्त कॉलनी, कॅम्प-२, अशादिप शाळेजवळ, अमरावती.** | **आंबा वृक्ष** | **०१** | **दि.०८/०१/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता आंब्याचे झाड अर्जदाराचे घराच्या बाहेर नजुलच्या जागेत आहे झाड हिरवेगार आहे. वृक्षतोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. सबब निर्णयार्थ सादर.** | वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे. | वृक्षा काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| २. | **संजय बाबाराव ढोरे अभिनव कॉलनी, अमरावती.** | **इंग्रजी चिंच** | **०५** | **दि.०८/०१/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सदर झाडे मुख्य रस्त्यावर आहे. या पुर्वी M.S.E.B द्वारा तारात गेलेल्या फांद्या छाटण्याचे निर्देशनास आले आहे. सदर झाडेच्या फांद्या एका बाजुने कापल्या मुळे इंग्रेजी चिंच चे ५ झाडे रस्त्याच्या दुसरा बाजुला झुकलेली आहे. त्यामुळे ये-जा करणारे वाहणांना अडथळा निर्माण होतो** | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही. | वृक्षाच्या ४ ते ६ इंच व्यासाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | झाडाचे बेलेन्स कायम ठेऊन उद्यान विभागाद्वारे सदर झाडाच्या फांद्या तोडण्यास परवानगी देण्यात हरकत नाही. सबब निर्णयार्थ सादर. | | |
| ३. | अभिनंदन अर्बन को. ऑप. बँक लि. अमरावती | कडुलिंब-२ कडुबादाम-१ (किडलेल्या) | ०३ | दि.०८/०१/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता २ कडु लिंब व एक कडु बादाम या झाडांच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. परंतु झाडयाचे बेलेंस कायम ठेऊन छाटणी करण्यात यावी. सबब निर्णयार्थ सादर. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही. | वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| ४. | सुनिल नथ्थुजी शेगोकार रा. संतोषी नगर, साहु बाग समोर, गल्ली नं.९, अमरावती | कडुलिंब | ०१ | दि.०८/०१/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जदाराच्या घराचा आवारात एक कडु लिंबाचे झाड आहे त्या झाडच्या मुळा व बुंधामुळे त्याचा घराचा आवारात भिंतीला मुळा मुळे तडे गेलेले आहेत सदर झाड हिरवेगार आहे नियमानुसार ६,०००/- अनामत रक्कम घेऊन परवानगी देण्यात हरकत नाही. सबब निर्णयार्थ सादर. | बुंधामुळे घराचा आवारात भिंतीला तडेगेले आहे. वृक्ष काढण्यास हरकत नाही. | नियमानुसार १:३ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर व अनामत रक्कम स्विकारून वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| ५. | कांचन भावे रा. लड्डा लेआऊट SBI बँकेच्या समोर, बियानी चौक, अमरावती | जांबुळ-१ बोर-१ | ०२ | दि.०८/०१/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता या प्रकरणात खालील बाबी निर्देशनास आलेले आहे.<br>१) अर्ज सौ. कांचन भावे यांनी केलेला आहे परंतु टॅक्स पावती श्री. प्रभाकर लक्ष्मीकांत जोशी या नावाची जोडलेली आहे या संदर्भात माहिती घेणे आवश्यक वाटते.<br>२) स्थळ निरिक्षण केल्यावर असे निर्दशनास आले की झाडाचा आजु–बाजुला अगदी जवळ कोणतीही इमारत नाही.<br>३) त्या झाडाचा काही अंतरावर एक इमारत पाडल्याचे निर्दशनास आले.<br>४) सदर इमारत कोणाची होती व ती पाडण्याकरिता म.न.पा. अमरावती यांची रितसर परवानगी घेतलेली आहे का या बाबत सर्व माहिती लेखी स्वारूपात प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करणे योग्य होईल. अर्जदाराला तसा पत्रव्यवहार करण्यात आला असुन अर्जदाराने सोबत पि.आर. कॉपी लावलेली आहे. जांभुळ वृक्षाचे जवळ सेफ्टी टँक पॉइंट येत असल्यामुळे वृक्ष काढणे आवश्यक आहे, असे अर्जात नमुद आहे. सबब निर्णयार्थ सादर. | जांभुळ वृक्षाचे जवळ सेफ्टी टँक पॉइंट येत असल्यामुळे परवानगी देण्यास हरकत नाही. | नियमानुसार १:३ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर व अनामत रक्कम स्विकारून वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| | विदर्भ महारोगी सेवा मंडळ | सु-बाभूळ | १५० | सविनय फेर सादर करण्यात येते कि मागील वृक्ष प्राधीकरण सभे मधील निर्देशानुसार वृक्षा | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६. | तपोवन अमरावती | | | अधिकारी व तांत्रिक सदस्य सह पुर्न पहाणी करण्याचे निर्देशीत करण्यात आले होते त्या अनुषगाने तपोवन संस्थेचे सचिव यांच्याशी विचारणा करण्यात आली असता परवानगी प्राप्त करण्या करिता ९,००,०००/- रूपये मनपा खाती अनामत रक्कम म्हणुन जमा करावी लागेल असे बोलणे झाले असता तपोवन संस्थाचे सचिव श्री. सहदेवराव गोळे यांनी अध्यक्षाशी विचारणा केल्या नंतर कडु असे म्हटले आहे करिता माहिती व उचित निर्णय सादर. | | |
| ७. | उपविभागीय अभियंता सा. बा. उपविभाग क्र.१ (निर्माण) अमरावती. | कडु लिंब | ३७ | सविनय फेर सादर करण्यात येते की मागील वृक्ष प्राधिकरण सभा मधीन दिलेल्या निर्देशानुसार संबधित विभागाला विना परवानगी वृक्ष तोड केल्याबाबत नोटिस बजावण्यात आली असुन नोटिसच्या अनुषंगाने उलट टपाली कार्यलयाला अहवाल प्राप्त झाला असुन अहवाल सोबत सलग्न आहे करिता माहिती व उचित निर्णयास सादर. | सदर सारथी प्रकल्प महाराष्ट्र शासनाचा असल्याने परवानगी देण्यास हरकत नाही. | नियमानुसार १:३ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर व अनामत रक्कम स्विकारून वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| ८. | श्री. मनिष नंदकिशोर मोहता, मौजे शेगांव, सर्वे क्र.४९, अमरावती | विविध प्रजातीची | ४१ | सविनय फेर सादर करण्यात येते की मागील वृक्ष प्राधिकरण सभा मधीन दिलेल्या निर्देशानुसार संबधित अर्जदाराला विना परवानगी वृक्ष तोड केल्याबाबत नोटिस बजावण्यात आली होती. तसेच वृक्ष प्राधिकरणाने दंडात्मक कार्यवाही करण्याबाबत सुध्दा निर्देशीत केले होते. दोन्ही नोटिसच्या अनुषंगाने उलट टपाली कार्यालयाला अहवाल प्राप्त झाला असुन अहवाल सोबत सलग्न आहे. करिता माहिती व उचित निर्णयास सादर. | अनामत रकमेचा भरणा करून घेण्यात यावा. | नियमानुसार १:३ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर व अनामत रक्कम स्विकारून वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| ९. | भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, ड्रीमलॅंड बिझनेस पार्क, बोरगांव धर्माळे, अमरावती | विविध प्रजातीचे | ११९ | मा.तांत्रिक सदस्य यांचे निर्देशानुसार अर्जदाराला विविध प्रजातीची किती वृक्षे आहेत, वृक्षाचे नांव, वृक्षाचा क्रमांक, वृक्षाची उंची, वृक्षाची जाडी, नमुद तक्त्यामध्ये भरून देणेबाबत सुचीत केले होते. काढावयाचे वृक्षाला लाल रंगाने, राखावयाचे वृक्षाला हिरव्या रंगाने नंबरींग करणेबाबत सुचविले होते. तसेच पर्यायी वृक्ष लागवड करणेकरीता स्थळदर्शक नकाशा सादर करण्यास कळविले | सर्विस्तर पाहणी अहवाल प्राप्त करून फेर सदर करावे. | सदर प्रकरणी अहवाल प्राप्त झाकल्यास नंतर प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | होते. तसा पत्र व्यवहार अर्जदाराला केला असुन त्याअनुषंगाने अर्जदाराने कार्यालयाला तसा अहवाल सादर केला आहे. करिता माहिती व उचित निर्णयास सादर. | | |
| १०. | श्री. गणेश दादाराव अनासाने, दहिसाथ चौक, भाजीबाजार, अमरावती विजय कॉलनी मधील मनपा बगीचा ऑनलाईन तक्रार | विविध प्रजाती | १४ | दि.११/१२/२०२४ रोजीची ऑनलाईन तक्रारी बाबत मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता परिसरात दोन बांधकामे सुरू असुन विना परवानगी वृक्ष तोड केल्याचे निर्देशनास येते. दंडात्मक कार्यवाही करणे अपेक्षीत आहे. सदर प्रकरणाबाबत पंचनामा करण्यात आला असुन फोटो सोबत संलग्न आहे. दि.१६/१२/२०२४ रोजी (आ.क्र.१८७९) पुढील कार्यवाही करीता बांधकाम विभाग, झोन क्र.१ यांचे कडे पाठविले असुन उपअभियंता यांचा दि.२०/१२/२०२४ रोजी अहवाल प्राप्त झाला. सदर अहवालात वृक्ष अज्ञात व्यक्तीने काढल्याचे निर्देशनास आले. तांत्रिक सदस्य यांचे अहवालनुसार सदर उद्यान मनपाचे असल्याने उद्यान विभागाने सविस्तर चौकशी करून किती वृक्षे, कोणती वृक्षे व कुणी वृक्षतोड केल्याबाबतचा अहवाल सादर करावा. असे अहवालात नमुद असुन उद्यान विभागा मार्फत सदर स्थळी बांधकाम विभागा मार्फत काम सुरू असल्याचे चर्चे दरम्यान समजले तरि या बाबत उपअभियंता झोन क्र.१ यांच्या कडुन अहवाल द्यावा लागेल जेणे करून संबधीत काम हे कोणत्या कंत्राटदार मार्फत सुरू आहे या बाबत माहिती मीळु शकेल उपअभियंता झोन क्र.१ यांच्या कडुन प्राप्त अहवाल पाहणी केली असता सभागृह व नाली चे बांधकाम सुरू असल्याचे समजले नाली चे बांधकाम म.न.पा मधुन कंत्राटदारयांच्या कडुन सुरू होते व सभागृहाचे बांधकाम सर्वजनिक बांधकाम विभाग यांच्या कडुन कंत्राटदार श्री. प्रतिक लोंढे कडुन सुरू असल्याचे समजले परंतु विना परवानगी वृक्ष तोड कोणी केली या बाबत माहिती मीळु शकली नाही असे अहवालात नमुद आहे करिता माहिती व उचित निर्णयास सादर. | कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांचे वर दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी. | सदर प्रकरणी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग व उपअभियंता झोन क्र. १ मनपा अमरावती यांचे वर दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी. |

# झोन क्र.१ वेळेवरील विषय

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | वृक्षांचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री. मिलिंद रघूनाथ जोशी, मॉडेल कॉलनी, पुणे | विविध प्रजाती | १३ | अर्जदार यांना घराची डागडुजी करणेकरीता विविध प्रजातीचे १३ वृक्षांच्या फांद्या काढावयाचे आहेत. परंतु सदर परिसरात विंचू-कॉटा चा त्रास असुन सदर परिसराची साफ सफाई करणे आवश्यक असल्याने सदर प्रकरण वेळेअभावी पाहणी होऊ शकली नाही. करिता माहिती व उचित निर्णयास सादर. | माहिती घेऊन पुढील समेत ठेवण्यात यावे | सदर प्रकरणी माहिती घेऊन प्रकरण पुढील समेत ठेवण्यात यावे फांद्या काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| २ | तंत्रविहार कॉलनी, रहाटगांव, अमरावती येथील नागरीक | रस्त्यावर आलेली झाडे-झुडपे | झाडे-झुडपे | तंत्रविहार कॉलनी, रहाटगांव, अमरावती येथील नागरीकांनी रस्त्यावर आलेली झाडे-झुडपे व काडी-कचरा पेटी काढणेकरीता कार्यालयात अर्ज प्राप्त झाला असुन सदर प्रकरण वेळेअभावी पाहणी होऊ शकली नाही. करिता माहिती व उचित निर्णयास सादर. | माहिती घेऊन पुढील समेत ठेवण्यात यावे | सदर प्रकरणी माहिती घेऊन प्रकरण पुढील समेत ठेवण्यात यावे फांद्या काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| ३ | श्री. रोशन अशोकराव तंतरपाळे, कल्पना नगर, नवसारी पॉवर हाऊसच्या मागे, विमवि रोड, अमरावती | बदाम-१ | ०१ | सदर झाडाच्या फांद्या विद्युत केबल मध्ये गेल्या असल्यामुळे तारांमध्ये स्पार्कींग होऊन आगीचे गोळे अंगणात पडत असल्यामुळे जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे कार्यालयात अर्ज प्राप्त झाला आहे. सदर प्रकरण वेळेअभावी पाहणी होऊ शकली नाही. करिता माहिती व उचित निर्णयास सादर. | विद्युत तारेला स्पर्श होत असलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही | वृक्षाच्या २ ते ३ इंच व्यासाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्याची उद्यान विभागामार्फत परवानगी देण्यात येत आहे. |
| ४ | श्री. रामचंद्र भु. उभाळे, धनश्री कॉलनी, शेगाव राहटगाव रोड, अमरावती | कडु बदाम | ०६ | सदर अर्जदार धनश्री विहार येथील रहिवासी असुन यांच्या घराच्या बाजुला रोड वर ६ कडु बदाम वृक्षाच्या फांद्या मोठ्या प्रमाणात वाढल्या असुन ये जा करणा-या नागरीकांना व स्कुल बसेस व इतर वाहनांना ना हक त्रास आहे करिता उद्यान विभागा मार्फत वाढलेल्या वृक्षाच्या फांद्या कादुन द्यावे लागेल. सदर प्रकरण वेळेअभावी पाहणी होऊ शकली नाही. करिता माहिती व उचित निर्णयास सादर. | माहिती घेऊन पुढील सभेत ठेवण्यात यावे | सदर प्रकरणी माहिती घेऊन प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे फांद्या काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| ५ | श्री. रामचंद्र यादव, गाडगेनगर | बिहाळ-१, | ०२ | सदर अर्जदार गाडगेनगर पोलिस स्टेशन समोरील रहिवासी असुन यांच्या घराच्या आत | विद्युत तारेला स्पर्श होत | वृक्षाच्या २ ते ३ इंच व्यासाच्या |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पोलिस स्टेशन समोर, अमरावती | कडुनिम-१ | | विहाळ-१, कडुनिम-१ वृक्ष मोठया प्रमाणात वाढलेला असुन वृक्षाच्या फांद्या इलेक्ट्रीक तारात गेलेल्या असल्यामुळे जिविताला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर प्रकरण वेळेअभावी पाहणी होऊ शकली नाही. करिता माहिती व उचित निर्णयास सादर. | असलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही | विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्याची उद्यान विभागामार्फत परवानगी देण्यात येत आहे. |

झोन क्र. २

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | वृक्षांचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्रीमती सुशिलाबाई बाबुराव बोंडे शिक्षक कॉलनी राम नगर जवळ अमरावती | आंबा वृक्ष फांदया | २ | दिनांक ०१/०१/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराचे स्वतःचे घराचे आवारात दोन मोठी आंबा वृक्ष छान वाढलेली व हिरवीगार आहेत. घराकडे झुकलेल्या २-४ इंच व्यासपर्यंतच्या फांदया तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. फांदया तोडतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सुचना देण्यात याव्यात. दोन आंबा वृक्षाच्या फांदया तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे.<br>कार्योत्तर मंजुरीस सादर.जा.क्र.८१०दि.०६/०१/२०२५ | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही. | वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. |
| २ | श्री. सुभाष नारायणसा नाईक मुदलीयार नगर अमरावती | कॅशिया वृक्ष फांदया | २ | दिनांक ०१/०१/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला.कॅशिया वृक्ष सार्वजनिक जागेवर मनपा उद्यानात आहेत. फांदया पुर्वीच काढण्यात आल्याचे दिसुन आले. कोणतीही अडचण नाही. वृक्ष / फांदया तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी.<br>अर्जदाराचे स्वतःचे घराचे आवारात एकही वृक्ष लावलेला दिसुन येत नाही. नागरीक्षेत्र झाडाचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे सेक्शन ५, सबसेक्शन ९ (१)नुसार दोन वृक्ष अर्जदारास लावण्याचे सुचित करावे. व अहवाल पाठविण्याचे कळवावे. अर्जदार यांना दोन वृक्ष लावण्याबाबत नोटिस देण्यात आली आहे. कार्योत्तर मंजुरीस सादर.जा.क्र.८११ दि.०६/०१/२०२५ | वृक्षाच्या फांद्या छान व सार्वजनिक जागेवर असल्यामुळे परवानगी देता येणार नाही. | वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. अर्जदारास घराचे आवारात २ वृक्ष लावण्याचे सूचित करावे व तसा अहवाल संबंधित विभागास द्यावा. |
| ३ | श्री.दामोधर लक्ष्मणराव सुंभाटे मुधोळकर पेठ अमरावती | कडुनिंब वृक्ष फांदया | १ | दिनांक १५/०१/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. कडुनिंब वृक्ष अर्जदाराचे घराचे आवारात छान वाढलेला व हिरवीगार आहे. रस्त्याकडे झुकलेला एक मोठा (६० से.मी पेक्षा जास्त जाडीचा ) फांदा काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. फांदा काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही. याची काळजी घेण्याच्या सुचना देण्यात याव्यात . | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही. | वृक्षाच्या ६० से.मी पेक्षा जास्त जाडीचा फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | श्री.ज्ञानेश्वर शंकरराव पाचंगे चुना भट्टी अंबादेवी रोड अमरावती | चिंच वृक्ष फांदया | १ | दिनांक १५/०१/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला.चिंचेचा वृक्ष अर्जदाराचे राहत्या घराचे परीसरात आहे. वृक्ष हिरवागार असुन प्रचंड वाढलेला आहे. अर्जदाराने बांधकाम करण्याचे आहे. असे अर्जात नमुद आहे. बांधकाम परवानगी घेतल्यानंतर वृक्ष काढण्याची नियमानुसार परवानगी देण्यास हरकत नाही. तत्पुर्वी विद्युत तारेकडे झुकलेल्या व घराकडे झुकलेल्या ४-६ इंच व्यासाच्या फांदया काढण्याची परवानगी देण्यात यावी. उचित निर्णयास सादर. | विद्युत तारेला स्पर्श होत असलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही | वृक्षाच्या ४ ते ६ इंच व्यासाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| ५ | श्री गोपी बबु बुंदिले जनार्द न पेठ अंबादेवी रोड अमरावती | पिंपळ वृक्ष | १ | दिनांक १५/०१/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. पिपंळ वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे. अर्जदाराने बांधकाम बिनापरवानगी सुरु केल्याचे दिसुन येते. झाडाच्या बुडामध्ये खोदकाम केल्याने वृक्षाचे संतुलन बिघडु शकते. करीता बांधकामाबाबत विचारणाकरुन त्वरीत बांधकाम थांबविण्यात यावे.अभियंत्यांचे पाहणीनंतर बांधकामात वृक्ष येत असल्यास वृक्ष काढण्याबाबत फांदया काढण्याबाबत निर्णय घेता येईल. तुर्त वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. व वृक्षाचे संतुलन बिघडेल असे खोदकाम करु नये असे आदेशित करण्यात यावे. उचित निर्णयास सादर. | बांधकाम तातडीने थांबविण्यात यावे.अभियंता यांनी पाहणी करुन अहवाल सादर करावा. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| ६ | श्री.चेतन वानखडे प्रशांत नगर,अम तक्रार कर्ते | आकाश निंम – २ वृक्ष अवैध्य वृक्षतोड | २ | दि. २७/०९/२०२४ रोजी वृक्ष प्राधिकरण सभा मध्ये प्रकरण ठेवण्यात आले होते. त्यानुसार सदर प्रकरणी तक्रारदाराचे नव्याने बयान नोंदवुन पुढिल सभेमध्ये प्रकरण ठेवण्यात यावे. असा निर्णय देण्यात आला आहे. तक्रारदार श्री वानखडे यांचा खुलासा प्राप्त झाला असुन वॉटसपवर पाठविलेली तक्रार तेच माझे बयान गृहित धरावे असे त्यांनी म्हटले असल्याचे दिसुन येते सबब दि. १८/०९/२०२४ रोजीचे अहवालनुसार कार्यवाही करण्यात यावी. उचित निर्णयास सादर<br>श्री. चेतन वानखडे, प्रशांत नगर,अमरावती यांचे मार्फत दि. ०९/०८/२०२४ रोजी ऑनलाईन तक्रार प्राप्त झाली. तक्रारनुसार स्वास्थ निरिक्षक यांचा अहवाल प्राप्त झाला. अहवाल नुसार दिनांक १८/०९/२०२४ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. डॉ. नवले यांनी जुने घर घेतले असुन त्यांचे नुतनीकरणाचे काम सुरु आहे. नव्याने डॉ. नवले यांचे हॉस्पीटल आर्थोपेडीक दवाखाना येथे सुरु होत असल्याचे दिसुन येते. दवाखाना दुरुन दिसावा फ्रंट झाडामुळे झाकल्या जातो. या कारणास्तव दोन, छान हिरवेगार वाढलेली २५ वर्षाची आकशनिंम वृक्ष तोडल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येते. तक्रारदार श्री चेतन वानखडे यांचे नव्याने बयान नोंदविण्यात यावे. झाडे तोडणा-यां सोबत त्यांचा संवाद झाल्याचे समजले असल्याने त्यांचे तक्रारीनुसार बयान नोंदवावे लागेल. तसेच एस.आय.पिवाल यांनी दिलेल्या चौकशी अहवाल | CCTV फुटेज बाबत पडताळणी करण्यात यावी.दोन्ही संबंधित व्यक्तीस आपले समक्ष सुनावणी घेण्यात यावी.लाकूड तोड्याचा शोध घेण्यात यावा. | दोन्ही अर्जदारास समक्ष सुनावणी घेऊन पुढील सभेत अहवाल सादर करावा व तेथे असलेले CCTV कॅमेरा ची तपासणी करावी. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | परीपुर्णनाही. योग्य अहवाल घेण्यात यावा. डॉ. नवले यांनी नोटिस घेण्यास देखील नकार दिल्याने पोष्टाने नोटिस पाठविल्याचे दिसुन येते. सबब दोन वृक्ष तोडल्याचे स्पष्ट होत आहे. सार्वजनिक रस्त्यावरील वृक्षाचाकोणताही संबंध नसतांना कोणीही तोडु शकत नाही. डॉ. नवले यांच्या सांगण्यावरुनच मजुरांनी वृक्ष तोडल्याचे श्री.चेतन वानखडे यांचेशी माझे बरोबर झालेल्या चर्चेस स्पष्ट झाले आहे.<br>सबब घराचे व दवाखाण्याचे मालकाचा डॉ. अंकुश नवले यांना नागरी क्षेत्र झाडाचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ वेळोवेळी सुधारीत नुसार प्रति वृक्ष १ लाख या नुसार २ लाख रुपये दंड व प्रती वृक्ष पर्यायी लागवडीची ठेव यानुसार दंडात्मक कारवाई प्रस्तावित करावी. दंड न भरल्यास त्यांचे घर टॅक्समध्ये जमा करण्यात यावे. तसेच मनपाने दिलेला परवाना देखील का रद्द करु नये असे ही विचारणा करण्यात यावी.<br>नोटिस दिल्याप्रमाणे गैरअर्जदार यांचा खुलासा प्राप्त मी नवले हॉस्पीटल या नावाने राजेंद्र कॉलनी रुख्मिनी नगर अमरावती येथे माझा वैद्यकीय व्यवसाय करीत असुन मला आपल्या कार्यालया मार्फत पाठविलेल्या नोटिसची माहिती मिळाली असता मी अचंबीत झालो. कारण की आपल्या नोटिस मध्ये वृक्षतोड कोणी केली व केव्हा केली याबाबत मला काहीही माहिती व ज्ञान नाही. मला नेहमी माझ्या व्यवसाया निमित्य बाहेरगावी जावे लागते माझ्या गैरहजेरीत अज्ञात व्यक्तीद्वारे सदरची वृक्षतोड करुन तूयाची विल्हेवाट लावली असावी. आपल्या कार्यालयास माझ्या विरुध्द चुकीची व बिनबुडाची माहिती व अहवाल देवुन मला मानसिक त्रास देणे सुरु आहे. वास्तविक पाहता सदर सार्वजनिक ठिकाणी असलेल्या वृक्षतोड कोणी केली व केव्हा झाली त्याची मला सुध्दा कल्पना व ज्ञान नाही,करीता माझे लेखी स्पष्टिकरण सविनय सादर. तरी आपण आपल्या अधिनस्त अधिका-या मार्फत सदर अज्ञान व्यक्ती विरोधात कार्यवाही करावी हि विनंती. अशा प्रकारे खुलासा प्राप्त झाला आहे. उचित निर्णयास सादर | | |
| ७ | श्री प्रमोद व्हि. इंगोले उपअभियंता मध्य झोन क्रं.२ मनपा अमरावती | कडुनिंब वृक्ष<br>गुलमोहर<br>शिशम<br>गुलमोहर<br>इंग्रजी चिंच<br>आकाश निंब<br>कडु बदाम<br>अशोका | १<br>३<br>१<br>९<br>१<br>१<br>१<br>१ | प्रभाग क्रं. १८ मधिल कंवर नगर मुख्य रस्त्या लगत तसेच फर्शी स्टॉप ते दस्तुर नगर चौकाकडे जाणा-या रस्त्यालगत कॉंक्रीट नालीमध्ये येणारे वृक्ष काढण्याबाबत सदर रस्त्याचे लगत कॉंक्रीट नालीचे बांधकाम करणे मंजुर आहे. सदर नालीचे बांधकामात येणारी एकुण १८ वृक्ष काढण्याची परवानगी आवश्यक आहे. असा अहवाल उपअभियंता यांचे मार्फत प्राप्त झाला आहे.<br>मा. तांत्रिक सदस्य यांचा अहवाल नालीच्या बांधकामात येणा-या वृक्षाची खालीलप्रमाणे माहिती देण्यात यावी.<br>१.नालीबांधकाम किती मिटर लांबीचे आहे. (रुंदीसह) | नालीचे बांधकाम तपासणी करण्यात यावी व अहवाल सादर करण्यात यावा. | तांत्रिक सदस्य यांचे सोबत पाहणी करून अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे. |

<table>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td>२. त्यातील वृक्षांची यादी खालीलप्रमाणे देण्यात यावी.
<table>
<tr><td>१)अ.क्र.</td><td>२)वृक्ष क्रमांक</td><td>३)वृक्षाचे नाव</td></tr>
<tr><td>४)वृक्षाचीउंची (मी.)</td><td>५)वृक्षाचीजाडी सेमी</td><td>६)वृक्षाचे वय</td></tr>
</table>
३. बांधकाम करणारी एजन्सी अथवा काम करणारी एजन्सी (जी पर्यायी वृक्ष लागवड करेल ) व त्याची जबाबदारी ( वाढविण्याची ) घेईल नमुद करावी.<br>४. प्रत्यक्ष बांधकामात येणारी वृक्ष लाल रंगाने व राखावयाची वृक्ष हिरव्यारंगाने चिन्हांकित करावी. ( ४ इंच आकाराची )<br>अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष पाहणी करुन निर्णयास वृक्ष प्राधिकरणाकडे ठेवता येईल. उचित निर्णयास सादर.</td><td></td><td></td></tr>
</table>

## झोन क्र.३

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | वृक्षांचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | शिलाताई बावनकर रा.महालक्ष्मी कॉलोनी | | १ | दि.१८/०१/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.भिंगरी वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला चं वाढलेला व हिरवागार आहे.अर्जदाराच्या आवारात झुकलेल्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.वृक्षाच्या बुडाजवळ कचरा जाळल्याचे दिसून आले.सबंधित स्वास्थ निरीक्षकांना कचरा जाळू नये असे सूचित करण्यात यावे.उचित निर्णयास्तव सादर.. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही. | वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| २ | श्री.दुर्गेश बन्सी मोगरे रा.जुना बायपास रोड | पिंपळ, कडूबदम, निंब,बदम | वृक्षांच्या फांद्या | दि.१६/०१/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.सर्व वृक्ष रस्त्याच्या कडेला छान वाढलेले व हिरवेगार आहे.म.न.पा.उद्यान विभागाने विद्युत मंडळाचे सहकार्याने वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची कार्यवाही करावी. उचित निर्णयास्तव सादर.. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही. | **वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्याची कार्यवाही उद्यान विभागामार्फत करण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| 3 | श्री मुशफिक शेख व इतर नागरिक रा.बिच्छू टेकडी ,अमरावती. | कडूनिंब | १ | दि.१६/०१/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.कडुलिंब वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे.वृक्ष श्रीमती मीरा वाघमारे यांच्या भिंतीला लागून आहे. सदर परिसर नझुल असून रस्ता सहा फुटाचा आहे.रस्त्याच्या बाजूला म.न.पा.ची नाली आहे.रस्ता कमी पडत असल्याने नळीवर स्लब टाकून रस्ता रुंद केल्या जाऊ शकतो किंवा कसे याबाबत | **बांधकाम विभागाच्या अभियंतांनी प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर करावा.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.अहवाल प्राप्त झाल्या नंतर प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | म.न.पा.बांधकाम विभागाच्या अभियंतांनी प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल दिल्या नंतर वृक्ष काढण्याची आवश्यकता आहे किंवा कसे या बाबत ठरविता येईल.अभियंताचा अहवाल प्राप्त झाल्या नंतर वृक्ष बाबत निर्णय घेण्यात यावा.तूर्त परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर.. | | |
| ४ | श्री.सुनील खडसे रा.ग्रीनपार्क सोसायटी अमरावती. | बोकर | १वृक्षांच्या फांद्या | दि.१८/०१/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.श्री पटवर्धन अर्जदाराचे शेजारी राहत असून त्याचे घरातील वृक्षाची पाने अर्जदाराचे घरात पडतात.अर्जदाराच्या आवारात येणाऱ्या १ ते २ इंच व्यासाच्या फांद्या श्री पटवर्धन यांच्या सहमतीने काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर.. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही. | वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| ५ | श्री.चेतन बोरकर रा. गौतम नगर अम. | सुबाभूळ-१ | ४ | दि.१८/०१/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.नझुल जमीन व ले-आउट यामध्ये असलेल्या १० फुट रस्त्यावर एक सुबाभूळ,एक रामफळ,एक कडूनिंब व एक इंग्रजी चिंच अशी चार वृक्ष रस्त्यावर आहेत.रहिवाशांनी रस्त्यावरील वृक्ष व विद्युत खांब काढण्याची मागणी केली आहे.सबब संबंधित बांधकाम अभियंता यांनी पाहणी करून वृक्ष व खांब मधात येत असल्यास तसा अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर.. | सबंधित बांधकाम अभियंता विभागाच्या अभियंतांनी प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर करावा. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.अहवाल प्राप्त झाल्या नंतर प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे. |
| ६ | श्रीमती मीनल जिरापुरे | कडू बदाम | १ | दि.१८/०१/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.अर्जदाराने जुने घर घेतले असून त्यावर नवीन बांधकाम सुरु आहे.अर्जदाराने बांधकाम परवानगी घेतली किंवा कसे? याबाबत बांधकाम परवानगी मागविण्यात यावी.त्यानंतर वृक्ष काढण्याबाबत विचार करता येईल तूर्त प्रकरण स्थगित ठेवण्यात यावे.वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर. | बांधकाम परवनगी सादर करण्यात आल्या नंतर प्रकरण सादर करावे | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| ७ | श्रीमती मीना इसोकर | | २ | दि.१६/०१/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.वकाण वृक्ष व फुलांचा वृक्ष सार्वजनिक रस्त्यावर असून छान वाढलेला व हिरवागार आहे.अर्जदाराने वृक्षाच्या बुध्यापर्यंत कॉंक्रीट केले आहे.वृक्ष काढण्याची आवश्यकता नाही.परवानगी नाकारण्यात यावी.कॉंक्रीट काढण्याचे सूचित करण्यात यावे. उचित निर्णयास्तव सादर. | झाडाच्या बुडा जवळील कॉंक्रीट काढण्याच्या सूचना देण्यात याव्या. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.अर्जदारास झाडाच्या बुडा जवळील कॉंक्रीट काढण्याच्या सूचना देण्यात याव्या. |
| ८ | श्री.अशोक बुंधे रा.जीवनज्योतीकॉलोनी | कडूनिंब | १ | दि.१८/०१/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.वृक्ष सार्वजनिक असल्याचे दिसून येते,वृक्षाच्या फांद्या पूर्वीच काढल्या आहेत.वृक्षाला फांद्या जास्त नाहीत. सबब वृक्ष काढण्याची व फांद्या तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर. | वृक्ष सार्वजनिक जागेवर असल्याने वृक्ष काढता येणार नाही. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| ९ | श्रीमती कुमुद भेंडे रा.पुंडलिकबाबा कॉलोनी | | २ | दि.१८/०१/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.वृक्ष रस्त्याच्या कडेला छान वाढलेला व हिरवागार आहे.अर्जदाराचा वृक्षाशी काहीही सबंध येत नाही.वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर. | वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे. | वृक्षा काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | श्री.प्रल्हाद ढोले रा.जलाराम नगर | उंबर | १ | दि.१८/०१/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.उंबर वृक्ष अर्जदाराच्या आवारात छान वाढलेला व हिरवागार आहे.विद्युत तारेकडे झुकलेल्या २ ते ३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही. | वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या विद्युत तारेमध्ये गेलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| ११ | श्री.दिनेश वाघ रा.वनश्री कॉलोनी अम. | सागवान | २ | दि.१८/०१/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.अर्जदाराच्या परिसरात दोन सागवान वृक्ष आहेत.अर्जदाराला बांधकाम करावयाचे आहे असे समजले.बांधकाम परवानगी घेतल्यानंतर नियमानुसार ठेव स्वीकारून दोन सागवान वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | सागवान वृक्ष असल्याने १:१ प्रमाणे ठेव रक्कम जमा करून घ्यावी. | बांधकाम परवानगी सादर केल्या नंतर नियमानुसार १:१ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर व अनामत रक्कम स्विकारून वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| १२ | श्रीमती आशा खांडपासोळे रा.गायत्री नगर. | बदाम | १ | दि.१८/०१/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.कडूबदाम वृक्ष अर्जदाराच्या आवारात नालीच्या काठावर छान वाढलेला व हिरवागार आहे.अर्जदाराला कम्पाउंड भिंत बांधावयाची आहे.वृक्षाला गोल करून कम्पाउंड भिंत होऊ शकते.अर्जदार घरी नसल्याने त्याचे मत जाणून घेता आले नाही.सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर | कंम्पाऊंड वॉल घेतांना इनर किंवा आऊटर रिंग घेवुन वृक्ष राहु शकतात | सदर वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |
| १३ | गैरअर्जदार श्री.मोहन नरसिंग बोळे रा.फ्रेजरपुरा | | | तक्रारदार श्री.मोहम्मद जासीर हनीफ शेख रा. फ्रेजरपुरा. यांनी दि.२३/१०/२०२४ रोजी तक्रार केली कि त्याचे शेजारी राहणारे गैरअर्जदार श्री मोहन बोळे यांनी स्वताच्या घरातील आवारात असलेले एक उंबर वृक्षाची अवैधपणे कटाई केली आहे.श्री जुनघरे यांनी पाहणी करून अहवाल दिल्याचे दिसून येते.अहवाल सोबत तोडलेल्या वृक्षाचा फोटो असून अवैधवृक्ष तोड झाल्याचे स्पष्ट झाले आहे.गैरअर्जदाराने स्वताच्या घरातील १ उंबर वृक्ष (अंदाजे वय ३० वर्ष) तोडून टाकला असून फक्त खोड शिल्लक ठेवले आहे.सबब गैरअर्जदार श्री बोळे यांना विनापरवानगी वृक्ष तोडल्या बाबत दि.०३/१२/२४ रोजी नोटीस देण्यात आली होती त्यावर त्यांनी आमच्या घरातील वृक्षाची थोडी फार छटाई केली असून वृक्षामुळे आमच्या घराला तडा गेलेल्या आहेत व घर पडू शकते त्यामुळे जीवित हानी होऊ शकते असा खुलासा सादर केला आहे.सोबत घराला तडा गेले असल्याचे फोटो व वृक्षाचा फोटो सादर केला आहे. उचित निर्णयास्तव सादर. | झाडाचे जतन करण्यात यावे | सादर खुलासा मान्य करण्यात यावा व झाड जतन करण्याचे अर्जदारास सूचित करावे. |
| १४ | श्री.वासुदेव नारायणराव माकोडे रा.वारतीय कॉलोनी अम. | कडूनिंब | १ | सदर प्रकरणात वृक्ष बांधकामात येतो किंवा कसे या बाबतचा अहवाल मा.सहा.संचालक नगर रचना अधिकारी .म.न.पा.यांच्या कडून प्राप्त झाला असून अहवाल पुढील प्रमाणे आहे.श्री वासुदेव माकोडे यांचा भूखंड अमरावती शहराच्या हद्दीतील मौजा | सदर झाड प्रत्यक्ष बांधकाम करताना मध्ये | प्रत्यक्ष पाहणी करून प्रकरण पुढील सभेत सादर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बेनोडा स.क्र.-३६/१/अ भूखंड क्र.२५,एकूण भूखंड क्षेत्र २७८.८१ चौ.मी.असून सदर भूखंडावर या कार्यालयातून दि ०७/०९/२४ रोजी निवासी बांधकामाकरिता बांधकाम परवानगी देण्यात आली आहे.सबब एक वृक्ष प्रत्यक्ष जागेवर असून तो मंजूर बांधकाम क्षेत्रात येत नसून रोड च्या जागेत आहे.परतू अर्जदाराच्या मंजूर बांधकाम परवानगी नकाशा नुसार सदर वृक्षामुळे कम्पाउंड गेट तसेच संरक्षण भिंत बांधकामास अडथळा निर्माण होतो असे दिसून येते.सोबत स्थळ दर्शक नकाशा तयार करून अहवालासोबत जोडला आहे. आपल्या माहितीस व उचित निर्णयास्तव सादर. | येते का या बाबत स्पष्ट अभिप्राय देण्यात यावा. | |

## झोन क्र. ४

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | वृक्षांचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | उपविभागीय अधिकारी, सार्व.बांधकाम विभाग क्र.२, अमरावती | विविध प्रजातीचे | ११ | दि. १७/०१/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>तांत्रिक सदस्यांचा अहवाल :- "अमरावती बडनेरा राष्ट्रीय महामार्ग क्र.६ चौपदरी करण्याचे काम सुरु करावयाचे आहे. रस्त्याचे रुंदीकरणात येणारी विविध प्रजातीची ११ वृक्ष काढण्याची परवानगी मागितलेली आहे. खालील अटींची पुर्तता केल्यानंतर परवानगी देण्यास हरकत नाही.<br>१.प्रत्यक्ष रस्ता व नाली बांधकामास येणारी वृक्ष कीती व कोणती आहे (मोजमाप घेवून) सुधारीत अहवाल सादर करावा.<br>२.रस्ता रुंदीकरण बांधकामात येणारे इतर अडथळे दुर केल्यानंतर जसे इलेक्ट्रीकपोल, डीपी इतर अतिक्रमण काढल्यानंतर सर्वात शेवटी वृक्ष काढण्यात यावी.<br>३.पर्यायी वृक्ष लागवडीचा स्थळदर्शक नकाशा सादरकरावा (त्याच रोडवरील)<br>४ नियमानूसार १:३ वृक्ष लागवडीकरीता ठेव स्विकारुन वृक्ष काढण्याची परवानगी देता येईल. तुर्त परवानगी नाकारण्यात यावी.<br>५.नॅशनल हायवे धोरणानूसार वृक्ष ट्रांसप्लांट करण्याबावत अभियंता यांनी आपले म्हणणे सादर करावे.<br>अहवालानुसार अर्जदाराने आवश्यक बाबींची पुर्तता केल्यानंतर वृक्ष काढण्याची परवानगी मंजुरीकरीता सादर. | जितके वृक्ष वाचविता येत असेल त्यांना वाचविण्याचा प्रयत्न करावा.शक्य असल्यास वृक्ष प्रत्यारोपानाबाबत प्रयत्न करावा. | जितके वृक्ष वाचविता येत असेल त्यांना वाचविण्याचा प्रयत्न करावा किवा वृक्षाचे प्रत्यारोपण करता येत असल्यास तसे करावे.अन्यथा नियमानुसार १:३ प्रमाणे अनामत रक्कम ठेव जमा करून वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | श्री रमाकांत श्रीकृष्ण पीडीयार,साईनगर, अम. | विविध प्रजातीचे | १३ | दि. १७/१/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>तांत्रिक सदस्यांचा अहवाल :- अर्जदाराचे लेआऊट मंजुर असून नियमानूसार करावयाचे रस्ते व नाली बांधकामात येणारी वृक्ष काढावयाचे असल्याचे दिसून आले. पुर्वलेआउट परिसरात १६ वृक्ष विविध प्रजातीची आहेत त्यापैकी २ इंग्रजी चिंच, ८ कडूनिंब, १ उंबर व २ अडजात असे एकुण १३ वृक्ष काढण्याची परवानगी नियमानूसार ठेव स्विकारुन देण्यास हरकत नाही तसेच लेआउटच्या पश्चिमेकडील ओपन स्पेस मध्ये ३ कडूनिंब वृक्ष राखण्यात यावेत. त्यास कोणतीही इजा पोहोचू नये असे आदेशित करण्यात यावे. "<br><u>अहवालानूसार वृक्ष काढण्याची परवानगी मंजुरीकरीता सादर</u> | परत स्थळ पाहणी करण्यात यावी. | जेवढी वृक्ष राखता येत असेल त्याबाबत तांत्रिक सदस्य यांचा अहवाल घेऊन प्रकरण पुढील सभेत सादर करावे. |
| ३ | श्री. सुभाष आनंदराव तट्टे, रा.कृष्णार्पण कॉलनी, अमरावती | सागवान | ६ | दि. १७/१/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>तांत्रिक सदस्यांचा अहवाल :- अर्जदाराकडे साग वृक्षासह इतर प्रजातीचीही वृक्ष आहेत. त्यापैकी ६ सागवान वृक्ष काढण्याची नियमानूसार साग वृक्ष धोरणाधीन राहून परवानगी देण्यास हरकत नाही<br><u>अहवालानूसार वृक्ष काढण्याची परवानगी मंजुरीकरीता सादर</u> | सागवान वृक्ष असल्याने १:१ प्रमाणे ठेव रक्कम जमा करून घ्यावी. | नियमानुसार १:१ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर व अनामत रक्कम स्विकारून वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |
| ४ | श्री. दिलीप भगवंतराव जवंजाळ, रा.उदय शिक्षक कॉलनी, साईनगर अमरावती | सागवान | १० | दि. १७/१/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>तांत्रिक सदस्यांचा अहवाल :- अर्जदार वृक्ष प्रेमी असून त्यांचेकडे विविध प्रजातीची २० वृक्ष आहेत. तुयापैकी १० साग वृक्ष काढण्याची (परिपक्व झालेली) परवानगी साग धोरणानूसार देण्यास हरकत नाही. (ठेव स्विकारून )<br><u>अहवालानूसार वृक्ष काढण्याची परवानगी मंजुरीकरीता सादर</u> | सागवान वृक्ष असल्याने १:१ प्रमाणे ठेव रक्कम जमा करून घ्यावी. | नियमानुसार १:१ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर व अनामत रक्कम स्विकारून वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | श्री. सुरेश डी. किनकर, रा. नवी वस्ती बडनेरा | विविध प्रजातीचे | ३ | दि. १७/१/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>तांत्रिक सदस्यांचा अहवाल :- अर्जदाराने चर्च परिसरात विविध प्रजातीची छान वाढलेली हिरवीगार बरीच वृक्ष आहेत. अर्जदारास निंब, रिठा व कडूनिंब वृक्षाच्या अस्ताव्यस्त वाढलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. फांद्या काढतांना वृक्षचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सुचना देण्यात याव्यात.<br>अहवालानुसार वृक्षांच्या फांद्या काढण्याची परवानगी मंजुरीकरीता सादर | वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही. | वृक्षाच्या २-३ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |

## झोन क्र. ५

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | वृक्षांचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्रीमती लता सुने महादा कोलनी रा.अमरावती | जामुन, रामफळ, रिठे, गुलमोहर | ०४ | मा. तांत्रिक सदस्य यांनी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जदारास बांधकाम करायचे आहे बांधकाम परवानगी आणि फॉर्म सी. आणि डी. या कागदाचे पूर्तता करून प्रकरण पाहण्याकरता ठेवावे. | कागदपत्रांची पूर्तता करून प्रकरण फेर सादर करावे. | पाहणी करून प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे. |
| २ | श्रीमती शांताबाई किसनराव खडसे. रा. माताखिडकी, अमरावती | वड वृक्ष | ०१ | अर्जदारास घरकुल निधी प्राप्त झाला असून अर्जदारास बांधकाम करायचे आहे परंतु अर्जदार यांनी बांधकाम आरंभ प्रमाणपत्र दिले नाही. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार यांच्या जवळ कोणतीही कागदपत्र नाही त्यांच्या अकाउंटला घरकुल निधी प्राप्त झाली असे त्यांचे म्हणणे आहे. | कागदपत्रांची पूर्तता करून प्रकरण फेर सादर करावे. | पाहणी करून प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे. |
| ३ | श्री दिग्विजय सुरेंद्र देशमुख रा. आचल विहार अमरावती | कडू निंब | ०१ | प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता अर्जदारास बांधकाम करायचे आहे. परंतु बांधकाम परवानगी दिलेली नाही बांधकाम परवानगी दिल्यानंतर विचार करता येईल. | कागदपत्रांची पूर्तता करून प्रकरण फेर सादर करावे. | पाहणी करून प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे. |

# उद्यान विभाग महानगरपालिका अमरावती
## वेळेवरील विषय

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | वृक्षांचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | उद्यान विभाग,मनपा अमरावती | उंबर वृक्ष | १ | मनपा परिसरातील हिरकणी कक्ष ज्या ठिकाणी उभारायचा आहे,त्याठिकाणी उंबराचे वृक्ष असून ती तोडण्याची परवानगी देण्यात यावी. | सदर परिसरातील पाहणी केली असता इतर ठिकाणी जागा उपलब्ध नसल्याने हिरकणी कक्ष उभारणी करीता वृक्ष काढावा लागेल. | शक्य असल्यास वृक्ष वाचवावा नियमानुसार १:३ प्रमाणे बदली वृक्ष लावण्याचे अटीवर वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |

विषय क्र.४ :- वृक्ष प्राधिकरण मनपा अमरावती अर्थ संकल्प सन २०२४-२५ समिती समोर सादर

प्रपत्र "अ"

अमरावती महानगरपालिका, अमरावती

सन २०२४-२५ चे बजेट

वृक्ष प्राधिकरण शिर्ष क्र.१९६ तरतूद -५०,००,०००

| ०१/०४/२०२४ ते ३०/११/२०२४ | | | | | ०१/१२/२०२४ ते ३१/०३/२०२५ | | | | ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | शिर्ष | प्रत्यक्ष उत्पन्न | प्रत्यक्ष खर्च (वृक्ष लागवड) | शिल्लक | अंदाजित उत्पन्न | अंदाजित खर्च | अंदाजित शिल्लक | कॉलम नं. ५+८ | अंदाजित उत्पन्न | अपेक्षीत खर्च |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | मागिल जमा (मुदती ठेव जमा) | १.५५.८१.४८६/- | २३.२०.४००/- | २.९६.९५.६१८/- | - | - | - | २.९१.७१.९५८/- | ८०,०००००/- | १.८०.०००००/- |
| २ | वृक्ष उपकर (२०२३-२४ वर्षात जमा) | १.३०.९८.४८४/- | | | ४०,०००००/- | २०,०००००/- | २०,०००००/- | | १.५०,००,०००/- | |
| ३ | वृक्ष प्राधिकरण (२०२३-२४ वर्षात जमा) | ४.०७.७१६/- | | | ३०,०००००/- | १५,०००००/- | १५,०००००/- | | ५०,०००००/- | |
| ४ | वृक्ष प्राधिकरण सुरवातीची शिल्लक दि. ०१/०४/२०२४ पर्यंत | २.०३.८३२/- | | | | | | | | |
| ५ | वृक्ष तोड परवानगी घ्या बदल्यात अनामत रक्कम सन-२०२३-२४ वसुल | ३२.९६.४६०/- | ४.९१.९६०/- | | - | - | - | | - | |
| | एकुण | ३.२५.०७.९७८/- | २८.१२.३६०/- | २.९६.९५.६१८/- | ७०,०००००/- | ३५,०००००/- | ३५,०००००/- | २.९१.७१.९५८/- | २.८०,००,०००/- | १.८०,०००००/- |

ठराव :- वृक्ष प्राधिकरण चे आर्थिक संकल्प सन २०२४-२५ मा.वृक्ष प्राधिकरण समिती समक्ष सादर करण्यात आले असून झालेल्या सांगोपान चर्चे अंती सदर अर्थ संकल्प मंजूर करण्यात येत आहे.

आयुक्त
महानगरपालिका अमरावती